# सीएसटी ते ग्रॅण्ट रोड ५ किमीचे भुयार तयार

## 'कुलाबा- वांद्रे- सीप्झ' मेट्रो-३ प्रकल्प प्रगतिपथावर



मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - कुलाबा- वांद्रे- सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर असून आतापर्यंत पाच कि.मी.च्या भुयाराचे काम पूर्ण झाले आहे. सीएसटी ते ग्रॅण्ट रोड व्हाया मेट्रो असा हा भुयारी मार्ग तयार झाल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) सांगितले.

शहरात मेट्रोच्या कामांनी वेग घेतलेला आहे. टीबीएम लॉंचिंग शाफ्टद्वारे टनेल बोरिंग मशीन्स भूगर्भात सोडून भुयारीकरणाचे काम सुरू आहे. मेट्रो-३ प्रकल्पासाठी एकूण १७ टीबीएम्सची आवश्यकता असून त्यापैकी १५ मशीन मुंबईत दाखल झाल्या आहेत. सध्या आठ मशीन पूर्णत: कार्यान्वित असून तीन मशीन भूगर्भात सोडण्याचे काम सुरू आहे. भुयारीकरणाचे काम सुरू झाल्यापासून वर्षभराच्या आत पाच कि.मी. लांबीचे भुयाराचे काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे म्हणाल्या.

### एकूण ५२ कि.मी.चे भुयारीकरण होणार

मेट्रो-३ प्रकल्पात अप आणि डाऊन मार्गावर एकूण ५२ किमीचे भुयारीकरण करण्यात येणार आहे. सध्या ८ टीबीएम्स दर आठवड्याला ३५० मीटर या वेगाने भुयारे खोदत आहेत. हा वेग येत्या ऑक्टोबर महिन्यापासून प्रति आठवडा ७०० ते ८०० मीटर जाणार आहे.